**मेसर्स ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी) यांच्या जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथील प्रस्तावित "ओएनजीसी न्हावा सप्लाय बेस पायाभूत सुविधांचे उन्नतीकरण व न्हावा येथील जेट्टीचे पुनर्विकास" प्रकल्पासंदर्भातील पर्यावरणीय जनसुनावणी बैठकीचे इतिवृत्त.**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी) यांच्यामार्फत प्रस्तावित "न्हावा येथील ओएनजीसी सप्लाय बेस पायाभूत सुविधांचे उन्नतीकरण व जेट्टीचे पुनर्विकास" या प्रकल्पासंदर्भातील पर्यावरणीय जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १२ जून २०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता सिद्धीविनायक बँक्वेट, शेलघर, सेक्टर-१६, आरटीआयएससी जवळ, खारकोपर, उलवे, ता. पनवेल - ४१०२०६, जि. रायगड येथे आयोजित करण्यात आली.

श्री. प्रशांत भोसले, उपप्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई तथा पर्यावरणीय जनसुनावणी समितीचे संयोजक यांनी पर्यावरणीय जनसुनावणी समितीचे अध्यक्ष तथा रायगडचे अपर जिल्हाधिकारी श्री. संदेश शिर्के, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी तथा समिती सदस्य श्री. संजय भोसले, पर्यावरणतज्ज्ञ, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, पत्रकार, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, कंपनीचे अधिकारी तसेच उपस्थित स्थानिक नागरिक व सहभागी यांचे स्वागत केले आणि पर्यावरणीय जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांची कार्यवाही सुरू करण्यासाठी परवानगी मागितली.

पर्यावरणीय जनसुनावणी समितीचे संयोजक प्रतिनिधी श्री. योगेश गोरे यांनी माहिती दिली की, भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या (MoEF&CC) दिनांक १४ सप्टेंबर २००६ च्या पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अधिसूचनेनुसार तसेच दिनांक १ डिसेंबर २००९ रोजी करण्यात आलेल्या सुधारित अधिसूचनेनुसार, सदर अधिसूचनेच्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या विशिष्ट प्रकल्पांसाठी पूर्व सार्वजनिक सल्लामसलत (Prior Public Consultation) करणे बंधनकारक आहे.

संयोजकांच्या प्रतिनिधींनी पुढे माहिती दिली की, पूर्व सार्वजनिक सल्लामसलतीचा उद्देश स्थानिक रहिवाशांना प्रस्तावित प्रकल्प, त्याअंतर्गत होणाऱ्या विकासात्मक उपक्रमांबाबत तसेच पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (EMP) याबाबत माहिती देणे आणि त्यांना प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात आपली मते, सूचना, शंका व आक्षेप व्यक्त करण्याची संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

त्यांनी पुढे माहिती दिली की, प्रस्तावित "न्हावा येथील ओएनजीसी सप्लाय बेस पायाभूत सुविधांचे उन्नतीकरण व जेट्टीचे पुनर्विकास, जिल्हा रायगड, महाराष्ट्र" या प्रकल्पासंदर्भात पर्यावरणीय जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तक मेसर्स ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी) यांच्याकडून दिनांक २०.०३.२०२६ रोजीचा अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयास प्राप्त झाला होता.

संयोजकांनी पुढे माहिती दिली की, पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अधिसूचना क्र. १५३३(E), दिनांक १४.०९.२००६ तसेच त्यामधील सुधारित अधिसूचनेनुसार प्रस्तावित उपक्रमांचा समावेश "B१" श्रेणीमध्ये होत असल्याने, या प्रकल्पासाठी भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून पूर्व पर्यावरणीय मंजुरी (Environmental Clearance) प्राप्त करणे आवश्यक आहे. यासाठी पूर्व पर्यावरणीय सार्वजनिक सल्लामसलत करणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी संदर्भ अटी (Terms of Reference - ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवाल तयार करण्यासाठी दिनांक ०७.०८.२०२५ रोजी महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे ऑनलाईन अर्ज सादर केला होता. सदर अर्जास दिनांक ३०.१०.२०२५ रोजी ऑनलाईन मान्यता प्राप्त झाली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार NABET मान्यता प्राप्त पर्यावरण सल्लागाराची नियुक्ती केली असून, त्यांच्यामार्फत पर्यावरणीय मूल्यांकन करण्यात आले आहे. प्रकल्प स्थळाच्या १०.० कि.मी. त्रिज्येतील परिसरामध्ये मार्च २०२५ ते मे २०२५ (पूर्व-मान्सून कालावधी) दरम्यान सविस्तर पर्यावरणीय सर्वेक्षण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्पाच्या उभारणीमुळे पर्यावरणावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा अभ्यास करण्यासाठी पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला व तो दिनांक १९.०३.२०२६ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करण्यात आला.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या रायगड-१ उपप्रादेशिक कार्यालय, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांनी दिनांक ११.०५.२०२६ रोजीच्या पत्राद्वारे प्रस्तावित प्रकल्पासंदर्भातील पर्यावरणीय जनसुनावणी घेण्यास परवानगी देण्याची विनंती जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे केली.

मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलीबाग यांनी दिनांक १५.०४.२०२६ रोजीच्या पत्रान्वये शुक्रवार, दिनांक १२ जून २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता प्रत्यक्ष पर्यावरणीय जनसुनावणी आयोजित करण्याचे निर्देश दिले. सिद्धीविनायक बँक्वेट, शेलघर, सेक्टर-१६, आरटीआयएससी जवळ, खारकोपर, उलवे, ता. पनवेल - ४१०२०६, जि. रायगड येथे आयोजित करण्याचे निर्देश दिले.

मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलीबाग यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर, भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली (MoEF&CC, GoI) यांनी निर्गमित केलेल्या अधिसूचना क्र. S.O. १५३३ दिनांक १४.०९.२००६ तसेच सुधारित अधिसूचना क्र. S.O. ३०६७(E) दिनांक ०१.१२.२००९ नुसार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबईचे सदस्य सचिव यांनी मंडळाच्या कार्यालयीन आदेश क्र. E-OS of २०२६, पत्र क्र. १/२६०४१०-FIS-०१०६ दिनांक ०८.०१.२०२६ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरणीय जनसुनावणी समितीची स्थापना केली आहे :-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी,रायगड, अलिबाग, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी – प्रादेशिक अधिकारी - रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला,सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४ | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला,सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४ | - | **आयोजक** |

सदर अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे रायगड-१ उपप्रादेशिक अधिकारी, रायगड भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांनी शनिवार, दिनांक ०९ मे २०२६ रोजी स्थानिक कृषीवल (मराठी) व इंडियन एक्सप्रेस (English) या वृत्तपत्रांमध्ये ३० दिवसांची आगाऊ सार्वजनिक सूचना प्रसिद्ध केली होती. प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात नागरिकांनी आपल्या सूचना, मते, शंका अथवा आक्षेप सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले होते.

तसेच, मसुदा पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (Draft EIA) अहवाल व त्याचा कार्यकारी सारांश (Executive Summary) मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये खालील अधिसूचित शासकीय कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले होते :-

| | |
|---|---|
| | पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम-मध्य प्रादेशिक कार्यालय, न्यू सचिवालय इमारत, तळमजला, पूर्व विभाग, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४०००१. |
| | मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलीबाग. |
| | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड, अलीबाग. |
| | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड, अलीबाग. |
| | उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, ता. पनवेल, जि. रायगड. |
| | उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, ता. उरण, जि. रायगड. |
| | उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय, ता. खालापूर, जि. रायगड. |
| | तहसीलदार, तहसील कार्यालय, ता. पनवेल, जि. रायगड. |
| | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ता. पनवेल, जि. रायगड. |
| | संयुक्त संचालक (WPC), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉइंट, तिसरा व चौथा मजला, सिने प्लॅनेट समोर, सायन सर्कल, सायन (पूर्व), मुंबई – ४०००२२. |
| | संचालक, पर्यावरण व हवामान बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मॅडम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०००३२. |
| | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉइंट, सिने प्लॅनेट सिनेमा समोर, तिसरा मजला, सायन-माटुंगा स्कीम रोड क्र. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई – ४०००२२. |
| | प्रादेशिक अधिकारी, रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४. |
| | ग्रामपंचायत कार्यालये : समूह ग्रामपंचायत न्हावा, ग्रामपंचायत कार्यालय – गाव्हाण, वहाळ व उलवे. |

मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलीबाग यांनी त्यांच्या दिनांक १५.०४.२०२६ च्या पत्रान्वये प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणीय बाबींवर पर्यावरणीय जनसुनावणी आयोजित करण्यास मान्यता दिली असून, सदर जनसुनावणी शुक्रवार, दिनांक १२ जून २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता सिद्धीविनायक बँक्वेट, शेलघर, सेक्टर-१६, आरटीआयएससी जवळ, खारकोपर, उलवे, ता. पनवेल – ४१०२०६, जि. रायगड येथे आयोजित करण्यात आली.

संबंधित आदेशानुसार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे रायगड-१ उपप्रादेशिक अधिकारी, नवी मुंबई यांनी जनतेस माहिती मिळावी यासाठी प्रस्तावित प्रकल्पासंदर्भातील पर्यावरणीय जनसुनावणीची सूचना शुद्धीपत्रकाद्वारे (Corrigendum) शनिवार, दिनांक ०९ मे २०२६ रोजी स्थानिक कृषीवल (मराठी) व इंडियन एक्सप्रेस (English) या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध केली.

आजपर्यंत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे रायगड-१ उपप्रादेशिक कार्यालय, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांना सदर प्रकल्पासंदर्भात ०३ हरकती/आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

संयोजकांनी स्पष्ट केले की, ही पर्यावरणीय जनसुनावणी समिती केवळ पर्यावरणासंदर्भातील जनतेची मते, सूचना व आक्षेप नोंदविण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे. या समितीस कोणत्याही प्रकल्पास मंजुरी देणे, नाकारणे अथवा शिफारस करणे यासंबंधी कोणतेही अधिकार नाहीत.

पर्यावरणीय जनसुनावणीदरम्यान स्थानिक नागरिकांनी मांडलेल्या सूचना व आक्षेपांची नोंद बैठकीच्या इतिवृत्तामध्ये करण्यात येईल. सदर इतिवृत्त मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये तयार करण्यात येईल. तसेच, बैठकीचे व्हिडिओ चित्रण, बैठकीची ध्वनीचित्रफीत, बैठकीमध्ये मांडण्यात आलेल्या सूचना व आक्षेपांचा विचार करून प्रकल्प प्रवर्तकांनी सुधारित केलेला पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवाल आणि बैठकीचे इतिवृत्त हे सर्व पर्यावरणीय जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्य कार्यालयामार्फत भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे सादर करण्यात येईल. याबाबत पुढील निर्णय तज्ज्ञ समितीद्वारे घेण्यात येतील.

त्यानंतर संयोजकांनी पर्यावरणीय जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांना पर्यावरण सल्लागारास सादरीकरण सुरू करण्याबाबत निर्देश देण्याची विनंती केली.

बैठकीच्या संयोजकांनी पुढे माहिती दिली की, अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदर बैठकीचे छायाचित्रण व व्हिडिओ चित्रण करण्यात येत आहे. सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर उपस्थित सहभागी आपले प्रश्न, सूचना, मते व आक्षेप मांडू शकतात. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार अथवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले पूर्ण नाव व राहत्या गावाचे नाव सांगावे.

**पर्यावरणीय जनसुनावणीचे इतिवृत्त**

मा. अध्यक्ष, पर्यावरणीय जनसुनावणी समिती यांच्या आदेशानुसार प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण व्यवस्थापन आराखड्यासह (EMP) इतर संबंधित बाबींची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

- प्रकल्प क्षेत्र, अक्षांश-रेखांश, नकाशा, लाभक्षेत्र, वनक्षेत्र, सीआरझेड (CRZ) स्थिती, प्रकल्पाची वैशिष्ट्ये, प्रकल्पाचे महत्त्व, संभाव्य परिणाम व भूमी वापर;
- प्रकल्पाची उद्दिष्टे, सामाजिक परिस्थिती, तसेच प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी;
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश व निष्कर्ष;

- सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण;
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी तसेच प्रकल्पग्रस्त क्षेत्रांबाबतची माहिती;
- प्रस्तावित प्रकल्पामुळे हवा, पाणी, विस्थापन व जैवविविधतेवर होणारे परिणाम आणि त्यांचे व्यवस्थापन;
- प्रकल्पाची अंमलबजावणी झाल्यानंतर करण्यात येणाऱ्या पर्यावरण व्यवस्थापनासंबंधी माहिती;
- इतर पर्यावरण व्यवस्थापन उपाययोजनांची माहिती.

सादरीकरणादरम्यान पर्यावरण सल्लागारांनी माहिती दिली की, प्रकल्प प्रवर्तक मेसर्स ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन लिमिटेड (ओएनजीसी) यांनी जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथील न्हावा येथील जेट्टीच्या पुर्नविकासासह ओएनजीसी न्हावा सप्लाय बेस पायाभूत सुविधांचे उन्नतीकरण करण्याचा प्रस्ताव मांडला आहे.

प्रस्तावित प्रकल्पामुळे रिगची हालचाल, अँकर हाताळणी, मालवाहतूक व इंधन पुरवठा, परतीचा माल (Backload) तसेच स्क्रॅप हाताळणी या कामकाजामध्ये सुधारणा होणार आहे. त्यामुळे सुरू असलेल्या कामकाजावर कोणताही परिणाम न करता न्हावा सप्लाय बेसचे आधुनिकीकरण व उन्नतीकरण प्रस्तावित करण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील. तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळून आरोग्य, शिक्षण व सामुदायिक पायाभूत सुविधांच्या विकासास हातभार लागेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. जवळील गावांतील अर्धकुशल व अकुशल स्थानिक कामगारांना प्राधान्य देण्यात येईल.
प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत ₹३५५.४३ कोटी इतकी आहे. पर्यावरण सल्लागारांनी प्रकल्पाच्या बांधकाम टप्प्यात राबविण्यात येणाऱ्या पर्यावरण व्यवस्थापन उपाययोजनांची सविस्तर माहिती सादर केली.

त्यांनी सांगितले की, बांधकामाच्या कालावधीत वनक्षेत्र व पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील भागांच्या जवळ रात्रीच्या वेळी कामकाज टाळण्यात येईल.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी नमूद केले की, प्रस्तावित प्रकल्प हा स्थानिक पनवेल तालुका, महाराष्ट्र राज्य तसेच देशाच्या हिताचा आहे.

सादरीकरणानंतर पर्यावरणीय जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांनी उपस्थितांना माहिती दिली की, प्रकल्प प्रवर्तकांनी बांधकाम कालावधीत तसेच प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रदूषण नियंत्रणासाठी राबविण्यात येणाऱ्या पर्यावरण व्यवस्थापन आराखड्यांची (EMP) सविस्तर माहिती दिली आहे. तथापि, उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पासंदर्भातील पर्यावरणीय मुद्द्यांवर आपली मते मांडावीत, असे आवाहन करण्यात आले. आपण मांडलेल्या सूचना व आक्षेपांची नोंद करण्यात येईल आणि

त्यांचा बैठकीच्या इतिवृत्तामध्ये समावेश केला जाईल. सूचना व आक्षेप नोंदविताना प्रथम संबंधित व्यक्तीने आपले नाव व राहत्या गावाचे नाव नमूद करावे.

त्यानंतर जनसुनावणीच्या संयोजकांनी प्रश्नोत्तर सत्रासाठी व्यासपीठ खुले असल्याचे जाहीर केले. जनतेकडून मांडण्यात आलेल्या मुद्द्यांचा सारांश पुढीलप्रमाणे आहे.

**पर्यावरणीय जनसुनावणीदरम्यान उपस्थित करण्यात आलेली मते, प्रश्न, सूचना/आक्षेप तसेच प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प पर्यावरण सल्लागार / पर्यावरणीय जनसुनावणी समिती यांच्याकडून देण्यात आलेली उत्तरे / आश्वासने :**

**१. श्री. विश्राख गजानन ग्रामप्रधान, न्हावा**

वक्त्यांनी प्रस्तावित प्रकल्पासाठी अतिरिक्त जमीन संपादनाची आवश्यकता व त्याची सद्यस्थिती याबाबत स्पष्टीकरण मागितले. तसेच, या प्रकल्पामुळे मच्छीमार व त्यांच्या उपजीविकेवर होणारे संभाव्य परिणाम तसेच कोणत्याही प्रकारचे पुनर्वसन किंवा वसाहती निर्माण होणार आहेत का, याबाबत माहिती विचारली.

प्रस्तावित प्रकल्पासाठी आवश्यक असल्यास जमीन संपादन हे जमीन संपादन अधिनियमाच्या तरतुदींनुसार करण्यात येईल. तथापि, या प्रकल्पासाठी कोणत्याही अतिरिक्त जमीन संपादनाची तसेच पुनर्वसन व पुनर्स्थापन (R&R) करण्याची आवश्यकता नाही. तसेच, या प्रकल्पामुळे मच्छीमार अथवा त्यांच्या उपजीविकेवर कोणताही प्रतिकूल परिणाम होण्याची अपेक्षा नाही.

**२. श्री. दीपक महादेव पाटील, वहाळ (ता. पनवेल), जि. रायगड**

येथे प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण दाखविण्यात आले आहे. हा विकासाभिमुख प्रकल्प असला तरी जनसुनावणीची प्रक्रिया कायदेशीरदृष्ट्या योग्य प्रकारे पार पडलेली नाही, कारण ओएनजीसी/महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत याचा पुरेसा प्रसार व प्रसिद्धी करण्यात आलेली नाही.

शासनाने घोषित केलेले ठाणे खाडीतील फ्लेमिंगो अभयारण्य हे प्रकल्पाच्या १० कि.मी. अभ्यास क्षेत्रामध्ये येत असल्यामुळे त्यासंदर्भात आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र (NOC) अथवा राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची (NBWL) मंजुरी घेण्यात आलेली नाही. प्रस्तावित प्रकल्पाचा परिणाम सदर अभयारण्यावर होण्याची शक्यता आहे.

तसेच, हा प्रकल्प आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता प्राप्त रामसर (Ramsar) आर्द्रभूमी क्षेत्राच्या प्रभावक्षेत्रात येतो.

पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालामध्ये रामसर क्षेत्राचा समावेश १० कि.मी. अभ्यास क्षेत्रात असूनही त्याचा अभ्यास का करण्यात आलेला नाही, याबाबत स्पष्टीकरण मागण्यात आले.

श्री. दीपक महादेव पाटील यांनी पुढे नमूद केले की, प्रकल्प प्रवर्तकांकडून प्रस्तावित ३३% हरित पट्टा (Green Belt) विकास हा प्रकल्पाच्या स्वरूपाच्या तुलनेत अपुरा आहे. ONGC हरित पट्टा विकासासाठी अधिक क्षेत्र सर्मपित करावे.

सध्या सुमारे ७०% कामकाज पिपावाव बंदराकडे हस्तांतरित करण्यात आले असून केवळ ३०% कामकाज न्हावा बेस येथे सुरू आहे. त्यामुळे विस्तार व पुनर्विकासानंतरही न्हावा बेसचा पूर्ण क्षमतेने वापर होणार नाही आणि परिणामी रोजगाराच्या संधी कमी होण्याची शक्यता आहे.
कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (CSR) उपक्रमांसाठी सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणामध्ये केवळ एका गावाचा समावेश करण्यात आला असून, गाव्हाण व वहाळ या गावांचाही समावेश करणे आवश्यक आहे.

प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरातील गावांवर, विशेषतः किनारपट्टीवरील भागांवर तसेच मच्छीमारांच्या उपजीविकेवर प्रदूषणाच्या माध्यमातून परिणाम होऊ शकतो.
तसेच, न्हावा विस्तार प्रकल्पामध्ये स्थानिक युवकांना १००% रोजगार उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

प्रकल्प प्रवर्तकांनी स्पष्ट केले की, मसुदा EIA अहवाल तसेच त्याचा कार्यकारी सारांश (Executive Summary) मराठी व इंग्रजी भाषेत न्हावा, गाव्हाण, वहाळ व उलवे ग्रामपंचायतींना सादर करण्यात आला होता. त्याबाबतची पोहोच (Acknowledgement) प्रत उपलब्ध असून आवश्यकतेनुसार दाखविण्यास तयार आहे.

फ्लेमिंगो अभयारण्य, रामसर स्थळ (Ramsar Site) तसेच संबंधित पर्यावरणीय बाबींविषयी उपस्थितांनी व्यक्त केलेल्या चिंता व निरीक्षणांची नोंद घेण्यात आली असून, त्यांचा योग्य तो विचार अंतिम पर्यावरण प्रभाव मूल्यांकन/पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (Final EIA/EMP) अहवालामध्ये करण्यात येईल.

प्रस्तावित वृक्षारोपण व हरित पट्टा विकास उपाययोजना अधिक प्रभावी करण्याच्या शक्यतेचा अभ्यास करून आवश्यक असल्यास त्याचा समावेश अंतिम EIA/EMP अहवालात करण्यात येईल.

सामाजिक-आर्थिक सर्वेक्षणामध्ये समाविष्ट गावांची व्याप्ती तसेच CSR उपक्रमांबाबत व्यक्त करण्यात आलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आली आहे. ओएनजीसीच्या धोरणांनुसार व प्रकल्पाच्या

आवश्यकतांनुसार CSR व सामुदायिक विकास कार्यक्रम अंतिम करताना या सूचनांचा योग्य तो विचार करण्यात येईल.

### ३. श्री. हनुमान एस. बधोरी – उपसरपंच, न्हावा (ता. पनवेल), जि. रायगड

वक्त्यांनी प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधींबाबत स्पष्टीकरण मागितले.

पूर्वी सुमारे ११०० कामगार/ऑपरेटर कार्यरत होते, तर सध्या त्यांची संख्या सुमारे ७०० पर्यंत कमी झाली असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यात ही संख्या आणखी कमी होण्याची शक्यता असल्याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली.

निवृत्त होणाऱ्या कामगारांच्या जागी नवीन कामगारांची नियुक्ती केली जाणार आहे का, याबाबत स्पष्टीकरण मागण्यात आले.

तसेच, काही भागांमध्ये मॅन्ग्रोव्ह वनस्पतींचे नुकसान अथवा नाश झाल्याची बाब त्यांनी उपस्थित केली.

मॅन्ग्रोव्ह संवर्धन व संरक्षणासाठी पुरेशी कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचा आरोपही त्यांनी केला.

मॅन्ग्रोव्ह संवर्धन व पुनर्स्थापना.

ओएनजीसीमार्फत एकूण किती मॅन्ग्रोव्ह रोपे लागवड करण्याचे प्रस्तावित आहे, याबाबत सविस्तर माहिती मागविण्यात आली.

तसेच, शेड बांधकामाच्या सुरुवातीच्या टप्प्यात काही ठिकाणी वृक्षतोड करण्यात आली असून मोठ्या वृक्षांची कत्तल झाल्याचे नमूद करण्यात आले. त्याबाबतची सविस्तर माहिती देण्याची मागणी करण्यात आली.

स्थानिक गावकऱ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

ओएनजीसीमध्ये कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून देण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. आतापर्यंत केवळ ७ गावकऱ्यांना रोजगार देण्यात आल्याची बाब नमूद करण्यात आली. स्थानिक गावकऱ्यांना मर्यादित प्रमाणात रोजगार मिळाल्याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. तसेच, रोजगारित कर्मचाऱ्यांची संख्या लेखी स्वरूपात देण्याची मागणी करण्यात आली.

सध्या सुमारे ६४७ कर्मचारी कार्यरत असून, सेवानिवृत्तीनंतर रिक्त होणाऱ्या पदांवर नवीन भरती (Replenishment of Vacancies) करण्यात येणार नाही, याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली.

स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन, व्यावसायिक आरोग्य व सुरक्षा (Occupational Health & Safety) याबाबत माहिती मागविण्यात आली.

रस्ते विकास तसेच कोच/वाहतूक सुविधांवरील कामकाजाबाबत माहिती विचारण्यात आली.
धूळ नियंत्रणासाठी (Dust Suppression) ओएनजीसी कोणत्या उपाययोजना करणार आहे, याबाबत स्पष्टीकरण मागण्यात आले.

वरील सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात आली.

**४. श्री. प्रकाश, न्हावा गाव**

न्हावा येथील ओएनजीसी प्रकल्पामध्ये अतिरिक्त रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत का, याबाबत विचारणा करण्यात आली.

प्रकल्पामुळे मच्छीमार व स्थानिक बोटचालकांच्या उपजीविकेवर परिणाम झाल्यास त्यांना ओएनजीसीमार्फत नुकसानभरपाई देण्यात येईल का, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला.
कार्यस्थळी व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य (Occupational Safety and Health - OSH) सुनिश्चित करण्यासाठी ओएनजीसी कोणत्या उपाययोजना करणार आहे, याबाबत माहिती मागविण्यात आली.

CSR/CER अंतर्गत पाणीपुरवठ्यासाठी कोणत्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत, याबाबत विचारणा करण्यात आली.

ओएनजीसीमार्फत कायमस्वरूपी आर.ओ. (RO) जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात येणार आहे का, याबाबत प्रश्न विचारण्यात आला.

पाणीटंचाईच्या कालावधीत न्हावा व परिसरातील गावांना पुरविण्यात येणाऱ्या पाण्याची वारंवारता व प्रमाण वाढविण्याची मागणी करण्यात आली.
तसेच, शेजारील गावांमधील पाणीटंचाईची समस्या CSR अंतर्गत ओएनजीसीने प्रभावीपणे सोडवावी, अशी मागणी करण्यात आली.

प्रस्तावित प्रकल्पासाठी जमीन संपादन हे जमीन संपादन अधिनियमाच्या तरतुदींनुसार करण्यात येईल. तथापि, या प्रकल्पासाठी कोणत्याही अतिरिक्त जमीन संपादनाची तसेच पुनर्वसन व पुनर्स्थापन (R&R) करण्याची आवश्यकता नाही. तसेच, या प्रकल्पामुळे मच्छीमार अथवा त्यांच्या उपजीविकेवर कोणताही प्रतिकूल परिणाम होण्याची अपेक्षा नाही.

परिसरातील गावांच्या विकासासाठी CSR निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

## ५. श्री. आशीष पाटील, न्हावा

वक्त्यांनी कामगार तसेच परिसरातील रहिवाशांसाठी उपलब्ध असलेल्या व्यावसायिक आरोग्य व सुरक्षा (Occupational Health & Safety) उपाययोजना, आरोग्यसेवा सुविधा व आपत्कालीन वैद्यकीय सेवांबाबत माहिती मागविली. तसेच, प्रस्तावित प्रकल्पामुळे किती रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे, याबाबत स्पष्टीकरण विचारले.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की, स्थानिक नागरिकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्ये तसेच अर्धकुशल कामगार म्हणून असलेल्या पात्रतेनुसार प्राधान्य दिले जाईल. तसेच, ओएनजीसीच्या धोरणानुसार करार देताना स्थानिक कंत्राटदारांनाही प्राधान्य देण्यात येईल. स्थानिक नागरिकांना शक्य तितक्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा ओएनजीसी प्रयत्न करेल.

## ६. श्री. राजेश गणेश म्हात्रे, न्हावा गाव

वक्त्यांनी स्थाननिहाय लॉजिस्टिक व्यवस्थापन, जेएनपीटी (JNPT) च्या मर्यादा तसेच न्हावा सप्लाय बेसमध्ये लागणारा एकूण कालावधी याबाबत स्पष्टीकरण मागितले. पिपावाव बंदराचा तात्पुरता वापर करण्यात येत असून, न्हावा सप्लाय बेसची कार्यक्षमता पूर्ववत करून त्याची क्षमता वाढविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच, समुद्री शंख-शिंपले (Seashells) परिसरातून लुप्त होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. हे उच्चस्तरीय प्रदूषणाचे संकेतक असल्याचे नमूद करून, या संदर्भात ओएनजीसीने पर्यावरण व्यवस्थापन आराखड्यामध्ये (EMP) कोणत्या उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत, याबाबत माहिती मागविली.

समुद्री शंख-शिंपले लुप्त होण्याबाबत तसेच त्यासंबंधित संभाव्य पर्यावरणीय परिणामांबाबत व्यक्त करण्यात आलेल्या चिंतेची प्रकल्प प्रवर्तकांनी नोंद घेतली आहे. या बाबीचा सविस्तर अभ्यास करण्यात येईल आणि आवश्यकतेनुसार योग्य प्रतिबंधात्मक व शमनात्मक उपाययोजनांचा समावेश अंतिम पर्यावरण प्रभाव मूल्यांकन/पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (Final EIA/EMP Report) मध्ये करण्यात येईल.

यानंतर पर्यावरणीय जनसुनावणी समितीच्या सदस्यांनी सर्व उपस्थितांना आवाहन केले की, प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात कोणाकडेही पर्यावरणीय सूचना अथवा आक्षेप असल्यास ते मांडावेत. तथापि, यानंतर उपस्थितांकडून कोणतीही अतिरिक्त प्रतिक्रिया प्राप्त झाली नाही.

मा. अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी, रायगड यांनी निर्देश दिले की, प्राप्त झालेली सर्व निवेदने स्वीकारून त्यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावीत. जनसुनावणीमध्ये एकूण १०

सार्वजनिक प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ, व्यावसायिक तसेच पर्यावरणतज्ज्ञ सहभागी झाले होते. त्यांनी प्रकल्पासंदर्भात आपल्या सूचना, आक्षेप व अपेक्षा व्यक्त केल्या.

तसेच, मा. अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी, रायगड, जनसुनावणी समितीचे सदस्य, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी, रायगड तसेच प्रकल्प प्रवर्तक यांनी पर्यावरणीय मुद्द्यांबाबत ग्रामस्थ व नागरिकांनी मांडलेल्या सूचना व आक्षेपांची नोंद घेतली.

शेवटी, मा. अध्यक्ष तथा अपर जिल्हाधिकारी, रायगड यांनी शांततापूर्ण वातावरणात जनसुनावणीमध्ये सहभागी होऊन आपली मते नोंदविल्याबद्दल सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि जनसुनावणीची कार्यवाही पूर्ण झाल्याचे घोषित केले.

पर्यावरणीय जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांनी कायदेशीर प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी सर्व सहभागींच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले आणि पर्यावरणीय जनसुनावणी समाप्त झाल्याची घोषणा केली.

सोबत ०३ हरकती/आक्षेप आलेल्या आहेत.

**(प्रशांत भोसले)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
रायगड-१,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

**(संजय भोसले)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, रायगड
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड, जिल्हा – रायगड